**रे. दि. मु. क्रमांक १६९/२०२३ मधील नि. क्र. ४० खालील आदेश.**
**कै. सदा सुभा कांबळे (म.वा.) श्रीरंग सदा कांबळे व स्वप्नील श्रीरंग कांबळे विरुध्द श्री अजय भागा कांबळे व इतर १**
**(आदेश पारित दिनांक ०१.०४.२०२४)**

---

सदरचा अर्ज वादी यांनी दाखल केला आहे. वादीनुसार, सदर दाव्यात मे. कोर्टाच्या आदेशाने दिनांक ०३/११/२०२३ रोजी बांधकाम करण्यास पुर्णतः सदर वाद मिळकतीवर दावा पुर्णपणे निकाल लागेपर्यंत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये असा आदेश असताना प्रतिवादी नामे श्री अजय भागा कांबळे यांनी वाद मिळकतीवर बांधकाम चालुच ठेवले आहे व ते आजतागायत बांधकाम करित आहेत. मे. कोर्टाने निशाणी ५ वरील आदेशाप्रमाणे बांधकामास पुर्णपणे स्थगिती असताना देखील प्रतिवादी हे मा. कोर्टाच्या आदेशाचे पालन न करता हे कोर्टाच्या आदेशाचे अवमान करीत आहे. तरी, प्रतिवादी यांनी कोर्टाच्या आदेशाचे अवमान केल्यामुळे संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी मिळावी, प्रतिवादी यांनी कोर्टाच्या आदेशाचे पालन न केल्यामुळे संबंधितांना दंड करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०२. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी आपले म्हणणे निशाणी क्र. ४४ वर दाखल केलेले आहे. प्रतिवादी नं. १ नुसार, वादीने दिलेला अर्ज हा बेकायदेशीर असून या दाव्यामध्ये कायद्यानेच असा अर्ज देता येणार नाही. प्रतिवादी नं. १ ने या मे. कोर्टाने दिलेल्या आदेशानंतर कोणतेही व कसल्याही प्रकारचे बांधकाम केलेले नसलेने मे. कोर्टाचा अवमान करणेचा प्रश्नच उद्भवत नाही. ताकीद अर्जाचे युक्तीवाद अगोदरच प्रतिवादी नं. १ चे सर्व बांधकाम पूर्ण झालेले होते व तसे युक्तीवादामध्ये सांगितले होते. त्यामुळे ताकीदीनंतर आजतागायत प्रतिवादी नं. १ बांधकाम करत आहे हे प्रतिवादीस मान्य व कबूल नाही. प्रतिवादीने या मे. कोर्टाचे आदेशाचा अवमान केलेला नाही. या दाव्यात वादीने दिलेल्या अर्जामध्ये अशाप्रकारची विनंती कायद्यानेच करता येणार नाही त्यामुळे वादीचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा. या अर्जासोबत दाखल केलेले फोटो हे ताकीदीच्या पूर्वीच्या बांधकामाचे असून त्यावर तारखा हया मॅनेज करुन टाकलेल्या आहेत. तसेच फोटोग्राफरचा कोणताही पुरावा या अर्जासोबत दाखल केला नाही.

त्यामुळे सदरचे फोटोग्राफ ग्राहय धरता येणार नाहीत. वादी हा प्रतिवादी नं. १ चा कोणीही नसून त्याने दुस–या कोर्टातील साहेब यांचे कोर्टात देखील प्रतिवादी नं. १ चे दावा दाखल करावयास सांगून त्याच्यामध्येही ताकीद मागितली होती परंतु सदरचा ताकीद अर्ज दुस–या कोर्टातील साहेब यांनी फेटाळलेने चिडून जावून सदरचा खोटा अर्ज या मे. कोर्टात दाखल केला आहे. सबब, मे. कोर्टाकडून सदरचे म्हणण्याचा विचार होवून सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा ही विनंती.

०३. सदरचा अर्ज, त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. सदरचा दावा हा अचल संपत्तीबाबत आहे. अर्जदाराला, तुर्तातुर्त ताकीद हुकूमाचा अर्ज पारित केल्यानंतर त्या आदेशाची अंमलबजावणी न केल्यास प्रतिवादी विरुद्ध दाद मागणेसाठी इतरही पर्याय उपलब्ध आहेत परंतु सदर अर्जामध्ये वादींनी फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी मागितली, तशा प्रकारची कोणती मागणी सदर दाव्यात करता येणार नाही. अर्जदाराला दुसरे पर्याय उपलब्ध असल्यामुळे खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादीचा निशाणी क्र. ४० चा अर्ज नामंजूर करणेत येतो. |
| २. | खर्चाबाबत आदेश नाही. |

PATTEBAHADUR KARUNA

Digitally signed by PATTEBAHADUR KARUNA
Date: 2024.04.05 10:53:58 +0530

(के. ए. पट्टेबहादुर)

दिनांकः– ०१.०४.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे–

न्यायालयाचे नाव : सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खंडाळा.

लघुलेखकाचे नाव : सौ. एस.एस.शिंदे

Sd/–

(एस.एस.शिंदे)

लघुलेखक